तळेगाव एमआयडीसी.पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,
Email -pstalegaonm.pcpc- mh@gov.in
मोबाईल नं. ७३५०३१७५३३

---------------०००००---------------

## प्रेस नोट ०४/०४/२०२३

**तळेगाव एमआयडीसी पो.स्टे गुन्हा रजि.नं. ७७/२०२३ ३०७, १४३ ,१४४, १४७ १४८, १४९, ४२७ भा.ह.का.क. ३, ४/२५ कि. लॉ. अ. ॲक्ट ३,७ मधील आरोपी अटक व तपास बाबत....**

फिर्यादी श्री.उदय अशोक लोंढे वय २३ वर्षे, रा. समता कॉलनी दिगंबर कुल यांचे भाडेच्या घरात वराळे ता. मावळ, जि.पुणे.हे दिनांक.३०/०३/२०२३ रोजी रात्री १०.२० वा. ते. १०:३० वा.चे दरम्यान वराळे ता. मावळ जि. पुणे.समता कॉलनीचे अंतर्गत रोडने ॲल्टो गाडीतुन जात असताना पुर्वीचे किरकोळ वादाच्या कारणावरून यातील आरोपीतांनी हातात पिस्तुल व कोयत्यासारखी हत्यारे घेवुन फिर्यादीचे ॲल्टो गाडी वर दगड मारून फिर्यादीचे पाठलाग करून फिर्यादीस जिवे ठार मारणेचे उददेशाने दोनदा पिस्तुल मधुन फायर केले व फिर्यादीने गाडी पार्क केली असता ॲल्टो कारवर दगड मारून कारचे नुकसान करून परिसरात दहशत निर्माण केली आहे. वगैरे मजकुराचे फिर्यादीवरून तळेगाव एमआयडीसी पो.स्टे गुन्हा रजि.नं. ७७/२०२३ भा.द.वि.का.क. ३०७, १४३ ,१४४, १४७ १४८, १४९, ४२७ भा.ह.का.क. ३, ४/२५ कि. लॉ. अ. ॲक्ट ३,७ प्रमाणे दिनांक ३१/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील आरोपीतांचे शोध घेणे संबधाने मा.विनयकुमार चोबे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिचवंड, मा. मनोज लोहिया, सह पोलीस आयुक्त, मा. डॉ. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त परि.०२ व श्री. पदमाकर घनवट,सहा.पोलीस आयुक्त,देहुरोड विभाग, पिंपरी चिचवंड यांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे गुंडा विरोधी पथक, पिंपरी चिचवंड कडील पथकाने गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे (१) अनिल जगन जाधव वय २३ वर्षे रा. शिक्षक कॉलनी वराळे ता.मावळ जि.पुणे (२) संजय ज्ञानेश्वर माळवदकर वय २४ वर्षे रा. तुमकर वाडा समता कॉलनी वराळे ता.मावळ जि.पुणे (३) कुमार सुरेश मोहिते वय २० वर्षे रा. विशाल लॉन्स जवळ वडगांव मावळ ता.मावळ जि.पुणे (४) हर्ष उर्फे सोन्या प्रमोद साठे वय १९ वर्षे रा. भिमाशंकर कॉलनी वराळे ता.मावळ जि.पुणे यांना ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना दिनांक ३१/०३/२०२३ रोजी अटक करणेत आली आहे.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक, रणजीत सांवत यांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे पोलीस ठाणेकडील गुन्हे तपास शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी गुन्हयातील उर्वरीत पाहीजे आरोपीचे तांत्रीक विश्लेषण व ठाव ठिकाणा बाबत मिळाले माहीती प्रमाणे सुदवडी भंडारा डोंगरातील झाडीत सापळा रचुन आरोपी नामे (५) विकास उर्फ बापु विष्णु रेठे वय २८ वर्षे रा. दत्तनगरी वडगाव मावळ ता.मावळ जि.पुणे व विधीसंघर्षीत बालक नामे (६) रोहन उर्फ चिक्या उत्तम शिंदे वय १७ वर्षे ३ महिने रा. वतननगर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे (७) राज उर्फे बारकु प्रमोद साठे वय १७ वर्षे ०८ महिने रा.भिमाशंकर कॉलनी वराळे मावळ ता.मावळ जि.पुणे यांना दिनांक ०३/०४/२०२३ रोजी अटक करणेत आली आहे.

वरील नमुद अटक आरोपी कडुन गुन्हयात वापरले देशी बनावटीचे पिस्टल , कोयते, लाकडी दांडके व गुन्हयात वापरलेल्या दोन मोटार सायकली जप्त करणेत आल्या आहेत. गुन्हयातील आरोपी विरूध्द यापुर्वी वडगाव पो.स्टे, तळेगाव दाभाडे पो.स्टे, हिंजवडी पो.स्टे व तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात दरोडा, खुन, खुनाचा प्रयत्न, मारामारी, बेकायदेशीर पणे शस्त्रे बाळगण्याचे गुन्हे दाखल आहेत.

वरीष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास व गुन्हयातील आरोपी अटक करणे कामी रणजीत सांवत, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सपोनि मनोजकुमार पांडे, पोउनि.पी.पी.आहिरे, पो.ना. १३६८, सुरेश जाधव, पो. ना. १०६७, डी.के.सातकर, पो.कॉ.२५९१, सचिन नांगरे तळेगाव एमआय डीसी पो.स्टे तसेच सपोनिरी एच व्ही माने, गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखा पिपंरी चिचवंड व त्यांचे पोलीस अंमलदार यांनी मिळुन कामगीरी केली आहे.

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उपआयुक्त
परिमंडळ – ०२ पिंपरी चिंचवड शहर